सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बार्टी-पुणे/BANRF-२०२२/२०२४-२५/ ८९३४ दिनांक १८/११/२०२४

# परिपत्रक

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)-२०२२ निवड यादी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF)-२०२२ अंतर्गत शासन निर्णय क्र. सान्यावि-२०२४/प्र.क्र.७७ दिनांक १० सप्टेंबर २०२४ अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या मार्फत देण्यात येणाऱ्या अधिछात्रवृत्ती योजनेतील सन २०२२ च्या ७६३ विद्यार्थ्यांची जाहिरातीनुसार आलेल्या अर्जांमधील कागदपत्रांची पडताळणी करून व शपथपत्र घेऊन पात्र विद्यार्थ्यांना नोंदणी दिनांकापासून १०० टक्के अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दि. १५/१०/२०२४ रोजी पात्र, अपात्र, प्रतिक्षित तसेच अनुउपस्थित विद्यार्थ्यांची यादी बार्टीच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याअनुषंगाने प्रतीक्षित (HOLD) वर असणाऱ्या एकूण उर्वरित ५० विद्यार्थ्यांपैकी १९ विद्यार्थी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आहे अशा विद्यार्थ्यांना पात्र यादीमध्ये समाविष्ट करण्यात येत आहे.

BANRF-२०२२ अंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे अवार्ड लेटर तसेच बार्टी, कार्यालयाकडे सादर करण्याबाबत प्रपत्र (प्रगती अहवाल, घरभाडे भत्ता) त्यांच्या वैयक्तिक ईमेल आयडीवर पाठविण्यात येईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

अधिछात्रवृत्ती बाबत मूळ कागदपत्र विभागास प्राप्त झाल्यानंतर ज्यांचे सर्व कागदपत्र परिपूर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती रक्कम त्यांच्या SBI बँक खात्यावर DBT मार्फत अदा करण्यात येईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. सदर यादी बाबत काही आक्षेप असल्यास या कार्यालयाच्या bartifellowship2023@gmail.com या ईमेल आयडीवर पुराव्यासहित सादर करावे.

-स्वाक्षरीत-
महासंचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व
प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे